Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २७२ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.१२ जुलै २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## थोडक्यात

### वरळी हिट अँड रन प्रकरणी एसआयटी चौकशी करा-वडेट्टीवार

**मुंबई**-मुंबईतील वरळी परिसरात महिलेला क्रूरपणे गाडीखाली चिरडल्याप्रकरणी अखेर मिहीर शाहाला अटक करणअयात आली. तब्बल तीन दिवसांनी वरळी हिट अँड रन प्रकरणी शिंदे गटाचा नेता राजेश शाहाचा मुलगा मिहिर शाहाला बेड्या ठोकण्यात आल्या. त्याच्यासह त्याला पळून जाण्यात मदत करणारे कुटुंबिय आणि मित्रालाही ताब्यात घेण्यात आले. आता याप्रकरणी डखढ चौकशी करण्यात यावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.दरम्यान वरळी हिट अँड रन प्रकरण सरकार कडून जाणूनबुजून दाबण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी आरोपीला वाचवण्याचा पूर्णपणे प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे वरळी हिट अँड रन प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करण्यात यावी. कारण त्या आरोपीने २४ तासांनी किंवा ४८ तासांनी दारु प्यायली होती की नाही, याची माहिती समोर येणार नाही. त्यामुळे त्याला लपवण्यात आले. तो कुठे आहे हे पोलिसांना माहिती होते. पण मुद्दाम त्याला लपवण्यात आले. त्याने दोन वेळा मेडीकल टेस्ट केल्या. त्यानंतर जेव्हा त्याला वाटलं की आता माझ्या शरीरात अल्कोहोल नाही तेव्हा तो पोलिसांच्या शरण आला, असे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

### ९४ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या

**मुंबई**-भंडारा जिल्ह्यात शिक्षकांची १५०० पदे रिक्त आहेत, सरकार मेगा भरतीच्या घोषणा करते पण पद भरती करत नाही. शिक्षकच नसतील तर विद्यार्थी कुठून राहणार असा प्रश्न उपस्थित करुन ही रिक्त पदे किती दिवसात भरणार याची हमी सरकारने द्यावी. साकोली, लाखणी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांना पुरेशा प्रमाणात वर्ग खोल्या नाहीत तसेच काही शाळांच्या वर्ग खोल्या मोडकळीस आल्या आहेत, त्या किती दिवसात बांधणार हे स्पष्ट करावे. ओबीसी समाजाच्या मुलांच्या वसतीगृहांचाही प्रश्न आहे. गरीबांच्या मुलांनी शिक्षणच घेऊ नये अशी सरकारची भूमिका आहे का, असा संताप व्यक्त करत ९४ हजार कोटींच्या प्रस्तावित पुरवणी मागण्यांमध्ये ओबीसी, आदिवासी, भटके, विमुक्त समाजाला किती वाटा मिळणार, हे स्पष्ट झाले पाहिजे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.विधानसभेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भंडारा जिल्ह्यातील विविध प्रश्न मांडून सरकारने भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी केली. पटोले पुढे म्हणाले की, भंडारा जिल्ह्यातील साकोली, लाखणी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांना पुरेशा प्रमाणात वर्ग खोल्या नाहीत, संगणक उपलब्ध नाहीत.

### महागाई भत्त्यात ४ टक्क्यांची वाढ

**मुंबई**-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ४ टक्क्यांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ४६ वरुन ५० टक्के करण्यात आला आहे. सरकारच्या या निर्णयाचा राज्यातील हजारो कर्मचाऱ्यांना मिळणार आहे.सरकार कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वर्षातून दोनदा वाढ करते. १ जानेवारी व १ जुलै या तारखांना ही वाढ केली जाते. पण निर्णय उशिरा घेतला जातो. त्यानुसार सरकारने आज बुधवारी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात १ जुलैपासून ४ टक्क्यांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाच्या आदेशानुसार, ही वाढ १ जानेवारी ते ३० जून २०२४ या कालावधीतील थकबाकीसह जुलै २०२४ च्या वेतनाबरोबर रोखीने दिली दिली जाणार आहे. शासकीय व निमशासकीयसह जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांनाही या निर्णयाचा लाभ होणार आहे.

# मुख्यमंत्र्यांनी स्वीकारला महाराष्ट्राचा सर्वोत्कृष्ट कृषी राज्याचा पुरस्कार

## महाराष्ट्र हा कृषी क्रांतीचा जनक-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### कृषी मंत्री धनंजय मुंडे पुरस्कार सोहळ्यात उपस्थित;१५ व्या कृषी नेतृत्व समितीचा पुरस्कार

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**-पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा यांच्या माध्यमातून राज्याकडून घेतल्या गेलेल्या शाश्वत विकास धोरणांची दखल घेत, १५व्या कृषी नेतृत्व समितीचा २०२४ चा प्रतिष्ठित सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा पुरस्कार राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासोबत स्वीकारला. केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांच्या हस्ते हा पुरस्कार बुधवारी नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला.

१५ व्या कृषी नेतृत्व समितीच्या- २०२४ काँनक्लेव्हचे ग्रीकल्चर टुडे समूहाच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आणि केरळचे राज्यपाल पी. सदाशिवम यांच्या अध्यक्षतेखाली १५व्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीने राज्यातील पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा आणि शाश्वत विकास धोरणांची दखल दखल घेत महाराष्ट्राची सर्वोत्तम कृषी राज्य म्हणून निवड केली आहे.पुरस्कार वितरण सोहळ्यात केंद्रीय रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान, ग्रीकल्चर टुडे समूहाचे अध्यक्ष डॉ. एम.जे. खान, राज्याच्या कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल व इतर मान्यवर उपस्थित होते.पुरस्कार स्वीकारल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील कृषी विकासाच्या विविध योजना आणि शाश्वत विकासासाठीच्या प्रयत्नांची यावेळी माहिती दिली. श्री.शिंदे म्हणाले, महाराष्ट्र हे कृषी क्रांतीचे जनक राज्य आहे. महाराष्ट्राला हरित क्रांतीची समृद्ध परंपरा असून कृषी व शेतकऱ्यांचा सन्मान करण्याची गौरवशाली परंपरा आहे. राज्याचा प्रमुख म्हणून हा पुरस्कार स्वीकारताना मला आनंद होत आहे. मी एक सामान्य शेतकरी कुटुंबातून आलो असून हा पुरस्कार स्वीकारताना मला मोठा अभिमान वाटतो. महाराष्ट्राला कृषी क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या राज्याच्या रूपात निवडल्याबद्दल 'ग्रीकल्चर टुडे' आणि परीक्षक मंडळाचे आभार मानले, महाराष्ट्राला मिळालेला पुरस्कार राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा सन्मान आहे. शेतकऱ्यांचे कष्ट, मेहनत आणि मातीच्या प्रेमाची ही फलश्रुती आहे. आमच्या शेतकऱ्यांना 'अन्नदाता' म्हणून मान दिला जातो आणि राज्य सरकारने त्यांच्या हितासाठी सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.




महाराष्ट्रातील शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास उत्सुक असून राज्यातील प्रगतीशील शेतकऱ्यांचा सन्मान केला जातो, जेणेकरून अधिकाधिक शेतकरी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करतील. बदलत्या काळानुसार आणि हवामानातील बदल पाहता, आमचा शेतकरी सदैव जागरूक आहे आणि त्यामुळेच महाराष्ट्र कृषी क्रांतीत अग्रेसर असल्याची माहिती श्री.शिंदे यांनी यावेळी दिली.

युनोचे सरचिटणीस अँण्टिवो गुट्रेस यांनी तापमान वाढीचे युग संपले असून, होरपळीचे युग सुरु झाल्याचे आणि तातडीच्या प्रयत्नांची गरज असल्याचे सांगितले होते. महाराष्ट्राने या आव्हानाला प्रतिसाद देत २१ लाख हेक्टरवर झाडे लावण्याचा आणि ५ टक्के बायोमास वापरण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्राने जगातील मानव जात वाचवण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. राज्य शासनाने बांबू मिशनला प्राधान्य दिले असून, बांबू ही विशेष वनस्पती असल्याचे सांगत, बांबू पासून २००० प्रकारच्या वस्तू तयार होत आहेत. 'बांबू घास नही खास है' असे म्हणत बांबूमुळे पर्यावरण संवर्धन आणि अन्नसुरक्षा यावरही भर दिला जात असल्याचे श्री.शिंदे यांनी सांगितले. मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, महाराष्ट्रात शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत. शेतकऱ्यांना कर्जमाफीसाठी सहकार्य केलं आहे. तसेच, पीक विमा योजनेत महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. लातूर जिल्ह्यात देशातील पहिला मायक्रो मिलेट क्लस्टर सुरू केला आहे आणि सिंचन प्रकल्पांद्वारे १७ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्याचा ध्येय निश्चित केले आहे.राज्यातील शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचं ठरवले आहे आणि कपास व सोयाबीन शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. राज्यातील कृषी क्षेत्रातील क्रांतिकारी निर्णयांमुळे महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट कृषी राज्याचा पुरस्कार मिळाला आहे. यामध्ये मायक्रो मिलेटचे उत्पादन वाढ, पीएम किसान सन्मान निधी दुप्पट, नॅनो-तंत्रज्ञान खतांचे वितरण, तृणधान्यांना एमएसपी, हरित पट्टा निर्माण आणि सिंचन क्षमता वाढ यांचा समावेश आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाकडून हवामान बदलाचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी सुमारे १० लाख हेक्टर जमिनीवर बांबूची लागवड करण्यात येत आहे. या क्रांतिकारी निर्णयाचे केंद्रीय कृषिमंत्री श्री. चौहान यांनी कौतुक केले.

## रानडुकराच्या हल्ल्यात शेतकरी जखमी;भटारी येथील घटना

**पोंभुर्णा । प्रतिनिधी**

घराच्या मागे असलेल्या सांदवाळीत वालाचे बियाणे टिबतांना सांदवाडीत बसलेल्या रानडुकराने अचानक हल्ला चढवून एकाला गंभीर जखमी केल्याची घटना पोंभूर्णा तालुक्यातील भटारी येथे दि. १० जुलै बुधवारला सायंकाळी ५:३० च्या सुमारास घडली.

मारोती परशुराम मडावी,वय (५५) वर्ष रा.भटारी असे गंभीर जखमीचे नाव आहे.

सविस्तर वृत्त असे,मारोती मडावी आपल्या घराला लागून असलेल्या सांदवाडीत वालाचे बियाणे टिबतांना सांदवाडीत बसलेल्या रानडुक्कराने अचानक त्याच्यावर हल्ला चढवून मारोती मडावी ह्याला गंभीर रित्या जखमी केले.घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.शिवसेना तालूका संघट सचिन



मडावी व वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी जखमीला पोंभूर्णा येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला तात्काळ चंद्रपूरला रेफर करण्यात आले.

## गुन्हेगारांना फाशीची शिक्षा द्या-बसपा पुलगाव

### बसपा तामिळनाडू प्रदेशाध्यक्ष के.आम्रस्ट्राँग यांच्या हत्येचा निषेध

**पुलगाव । प्रतिनिधी**

बहुजन समाज पार्टीचे तामिळनाडू प्रदेशाध्यक्ष व माजी नगरसेवक के. आर्मस्ट्राँग यांची शुक्रवारी ५ जुलैला निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या हत्येचा बहुजन समाज पार्टी पुलगावने निषेध केला असुन गुन्हेगारांना फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे.

बसपा तामिळनाडू प्रदेशाध्यक्ष के. आम्रस्ट्राँग यांची हत्या ही हत्या एका व्यक्तीची नसून लोकशाही मूल्यांवर आधारित राजकीय स्वातंत्र्यावर गंभीर हल्ला आहे. या क्रूर हत्याकांडाची चौकशी उच्चस्तरीय केंद्रीय अन्वेशन विभागामार्फत करून हत्येतील गुन्हेगारांना फाशीची शिक्षा देण्यात यावी. जेणेकरून भविष्यात अशाप्रकारचे गुन्हे परत



होणार नाही. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील. असे निवेदन नायब तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक यांच्या मार्फत महामहीम राष्ट्रपती यांना पाठविण्यात आले. बहुजन समाज पार्टीचे पुलगाव शहर अध्यक्ष विनोद बोरकर यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले. यावेळी विधानसभा अध्यक्ष धर्मपाल गायकवाड, माजी. नगरसेवक राजेश लोहकरे, उपाध्यक्ष शेख एजाज मन्सुरी, शहर सचिव प्रवीण कांबळे, शहर महासचिव प्रवीण हावरे, शहर कोषाध्यक्ष ईश्वर ठोंबरे, बामसेफ संयोजक राजपाल पाटील, संदीप बांगर, धीरज चंडाले, हेमलता शंभरकर, नितीन परुळकर, अजित पाटील, कुलदीप मनोहरे, शहर प्रभारी हर्षवर्धन गायकवाड इत्यादीची उपस्थिती होती.

## वरोरा शहरामध्ये डेंग्यूचा डंख,शहरात सर्वत्र फवारणी व फॉगिंग करा

### शिवसेना (उबाठा) गटाची मागणी,मुख्याधिकारी यांना दिले निवेदन

**वरोरा । प्रतिनिधी**

शहरामध्ये डेंग्यू आजाराने सध्या डोके वर काढले आहे. आत्तापर्यंत अनेक बाधित रुग्ण आढळून आले आहेत. तर, अनेक संशयित रुग्णांची तपासणी करण्यात येत आहे.डेंग्यूचा वाढता प्रभाव बघत नगर परिषद प्रशासनाच्या वतीने कुठलीही खबरदारी घेत नसल्याने डेंगू चा प्रसार वाढण्याची भीती आहे. त्यामुळे शहरात सर्वत्र फवारणी व फॉगिंग करण्यात यावी अशी मागणी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) गटाचे शहर प्रमुख संदीप मेश्राम यांनी निवेदनाद्वारे केली आहे. शहरात सध्या तापाची साथ सुरू असून डेंग्यू रुग्ण आढळल्याने नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नगर परिषद प्रशासनाकडून याची दखल घेवून उपाययोजना करावी अशी मागणी नागरिकांकडून होत असताना सुद्धा नगर परिषद प्रशासन थंडबस्त्यात आहे. त्यामुळे डेंग्यूचा प्रसार वाढत चालला आहे. आता पर्यंत अनेक रुग्ण बाधित झाले असून काही शासकीय रुग्णालयात तर काही खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहे. यावर तत्काळ उपयोजना न केल्यास डेंगू बाधित रुग्णाच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शहरातील प्रत्येक प्रभागात



कीटकनाशक फवारणी तसेच फॉगिंग करण्यात यावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहर प्रमुख संदीप मेश्राम यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केलेली आहे. तर त्वरित उपाययोजना करण्यात आली नाही तर शिवसेनेच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.यावेळी उपजिल्हाप्रमुख अमित निब्रड, शहर संघटक तथा माजी नगरसेवक किशोर टिपले, माजी नगरसेवक दिनेश यादव,उपशहर प्रमुख मनीष दोहतरे,युवासेना विधानसभा समन्वयक निखिल मांडवकर,पियूष जगताप,गजानन टोंगे, बंटी मांडवकर,तुषार पाल,अनिल गाडगे व आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## वरोरा येथील डायरिया मृत्यू प्रकरणातील दोषींवर कारवाई करा

### मालविय वार्ड येथील पिडीत वांढरे कूटूबींयासह वार्ड वासियांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**वरोरा । प्रतिनिधी**

नगर परिषदेच्या नाकर्तेपणामुळे येथील मालविय वार्डातील चार वर्षीय बालक पूर्वेश सुभाष वांढरे याचा नुकताच डायरियाने मृत्यू झाला. या संपूर्ण घटनेची गंभीर जबाबदारी नगर प्रशासनावर निश्चित करण्या सोबतच मृत मुलाच्या कुटुंबाला भरपाई मिळवून देण्यासाठीच्या मागणीचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते राहुल देवडे यांच्या नेतृत्वाखालील मालविय वार्डातील शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांना दिले.

निवेदनात शहरातील मालविय प्रभागातील स्मशानभूमी जवळील नालीच्या लगत असलेल्या नळाच्या पाण्याचा व्हॉल लिक आहे. त्या ठिकाणच्या जागेची अनेक दिवसांपासून स्वच्छता करण्यात आली नाही. आणि त्याच स्थितीत पाणीपुरवठा सुरू आहे. नालीचे घाण पाणी लिक व्हॉल मधूनच नळाद्वारे घरोघरी पुरवठा होत आहे. हे दुषित पाणी पिण्यात आल्याने मालविय वार्ड परिसरातील दोन, तीन कुटुंबांतील सदस्यांना डायरियाची लागण झाली. यात पूर्वेश वांढरे नामक चार वर्षीय मुलाचा नाहक बळी गेला. इतर बुडू वांढरे, प्रतिक्षा वांढरे, शोभा वांढरे, ओम बुरटकर, सौंदर्य बुरटकर आदींवर सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शुद्ध पेयजल व स्वच्छता बाबत नगर परिषदेची कमालीची उदासीनता या संपूर्ण



घटनेला कारणीभूत ठरत आहे. अनेकदा तक्रारी नंतरही त्याचे निराकरण होत नाही, ही शोकांतिका आहे.मृत मुलाचे पालक मिस्त्री काम करतात त्याच्या घरची परिस्थिती बेताची असल्याने या संपूर्ण घटनेची गंभीर जबाबदारी नगर प्रशासनावर निश्चित करण्या सोबतच मृत मुलाच्या कुटुंबाला नगर प्रशासना तर्फे आर्थिक सहाय्य अपेक्षित आहे. भविष्यात असे प्रकार घडू नये म्हणून शहरात सर्वच प्रभागात योग्य उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात यावे, इत्यादी मागण्या करण्यात आल्या आहेत.शिष्टमंडळात.सामाजिक कार्यकर्ता राहूल देवडे,मृतक पूर्वेशचे वडील सुभाष वांढरे,शामराव झाडे,अरून सोयाम,रामदास बहादे,प्रविन कायरकर,सुनिल झाडे,अनिल हिवरकर,राहूल मेश्राम,शुभम पवार,गणेश तांदूळकर,आकाश खतारे,रोशन बहादे,मोबीन पठान,छोटू चव्हान,मनिष गोचे,सुरज जेगंठे,आदींचा समावेश होता.


# प्रवासी राजा दिन कशासाठी ? प्रवाशांच्या उत्तम सेवेसाठी !

**प्रवाशांना एसटी बसस्थानक, बसस्थानकांवरील प्रसाधनगृहे ही स्वच्छ, निर्जंतुक आणि टापटीप असावीत असे वाटते. तसेच एसटी बसेस स्वच्छ व वेळापत्रकानुसार वेळेत मार्गस्थ व्हाव्यात, ठरलेले थांबे घ्यावेत, चालक-वाहक यांनी प्रवाशांशी सौजन्याने वागावे. कमी केलेल्या बसफेऱ्या पुनश्च सुरू कराव्यात. प्रवाशी संख्या विचारात घेऊन ज्यादा बसफेऱ्या वाढवाव्यात. रस्ता तयार असलेल्या गावांसाठी नवीन बसफेऱ्या सुरू कराव्यात. हात दाखवा, गाडी थांबवा ही योजना पुन्हा नियमितपणे राबवली जावी, अशी किमान अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त केली जाताहे. प्रवासी राजा दिनावर श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा मार्गदर्शक संकलित लेख प्रवाशांच्या सेवेशी सविनय सादर... संपादक.**



एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या समस्या, तक्रारी वजा सूचना यांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरणासाठी आता राज्यातील प्रत्येक आगार- डेपोमध्ये दर सोमवारी व शुक्रवारी एसटी प्रवासी राजा दिन आयोजित केला जाईल. त्यानुसार एसटीच्या विभाग नियंत्रकांना एका आगारात जाऊन प्रवाशांच्या समस्या, तक्रारी, सुचना ऐकून घ्याव्या लागणार आहेत. प्रवासी आपला आराध्य दैवत; तर परिवहन विभाग उपासक! असेच काहीसे चित्र दिसेल. एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्या भन्नाट संकल्पनेतून हा प्रयोग राबवला जाणार आहे. एसटी महामंडळाने या प्रकल्पानुसार प्रवाश्यांच्या समस्यांना गांभिर्याने घेत त्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजनेसाठी हा उपक्रम राबवण्याचे निश्चित केले आहे. त्यामुळे प्रवाशांचे समाधान होऊन प्रवासी सेवेचा दर्जा व गुणवत्ता वाढण्यास मदत होईल. ही अभिनव योजना दि.१५ जुलै २०२४पासून सुरू होणार आहे. शहरी व खेडूत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी-शिक्षक आपल्या समस्या-तक्रारी, सुचना लेखी स्वरूपात दर सोमवारी व शुक्रवारी संबंधित आगारात सकाळी १० ते २ या वेळेत मांडू शकतात. त्यावर विभाग नियंत्रक तातडीने कार्यवाही करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. प्रवासी राजा दिन कोणत्या दिवशी कोणत्या आगारात होणार आहे, याचे वेळापत्रक विभाग नियंत्रक त्या त्या वेळी जाहीर करतील. विशेष म्हणजे प्रत्येक लेखी तक्रारीची नोंद ठेवण्यात येणार असून याबाबत काय कार्यवाही केली आहे, यावर मध्यवर्ती कार्यालय लक्ष ठेवणार आहे. त्यावर योग्य कार्यवाही तसेच तक्रारदारांचे समाधान करणारी योग्य उपाययोजना करणे संबंधीत कार्यालयास भाग पडणार आहे, असा विश्वास वाटतो.

एसटीच्या विविध बसेस मधून दररोज सुमारे ५४ ते ५५ लाख प्रवाशांची सुरक्षित वाहतूक



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

केली जाते. प्रवाशांना एसटी बसस्थानक, बसस्थानकांवरील प्रसाधनगृहे ही स्वच्छ, निर्जंतुक आणि टापटीप असावीत असे वाटते. तसेच एसटी बसेस स्वच्छ व वेळापत्रकानुसार वेळेत मार्गस्थ व्हाव्यात, ठरलेले थांबे घ्यावेत, चालक-वाहक यांनी प्रवाशांशी सौजन्याने वागावे. कमी केलेल्या बसफेऱ्या पुनश्च सुरू कराव्यात. प्रवाशी संख्या विचारात घेऊन ज्यादा बसफेऱ्या वाढवाव्यात. रस्ता तयार असलेल्या गावांसाठी नवीन बसफेऱ्या सुरू कराव्यात. हात दाखवा, गाडी थांबवा ही योजना पुन्हा नियमितपणे राबवली जावी, अशी किमान अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त केली जाताहे. यासंबंधित प्रवाशी तक्रारींचे निराकरण वेळेत न झाल्याने प्रवाशांना गैरसोईचा सामना करावा लागतो. या समस्यांचे निराकरण स्थानिक पातळीवर तातडीने होऊ शकते. प्रवासी सेवेचा दर्जा आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रवाशांच्या समस्यांचे वेळीच निराकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. तसे झाल्यास प्रवाशांना समाधानकारक सेवा देणे एसटी महामंडळाला शक्य होणार आहे. अर्थात, प्रवाशांचे महत्तम समाधान हा उद्देश ठेऊन येत्या दि.१५ जुलै २०२४ पासून प्रवासी राजा दिन या अभिनव योजनेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व प्रवासी बंधू-भगिनींनी या योजनेचा लाभ घेऊन आपल्या समस्यांचे निराकरण करुन घ्यावे आणि आपले एसटी बसवरील प्रेम, विश्वास, निष्ठा व गरज आजही काही कमी झाले नाही, हे सिद्ध करून दाखवावेच.

दिन विशेष

प्रवासी सेवेचा दर्जा आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रवाशांच्या समस्यांचे वेळीच निराकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. तसे झाल्यास प्रवाशांना समाधानकारक सेवा देणे एसटी महामंडळाला शक्य सोयीचे होणार आहे. अर्थात प्रवाशांचे महत्तम समाधान हा उद्देश ठेऊन येत्या सोमवार, दि.१५ जुलै २०२४पासून एसटी प्रवासी राजा दिन या अभिनव योजनेचे आयोजन करण्यात येणार आहे, ही एक अत्यंत महत्वाची, आनंदाची आणि अभिमानास्पद बाब आहे. आपण कधी कधी लांब पल्ल्याचा किंवा अपरिहार्य प्रवास अनिच्छेनेच करत असतो. यादरम्यान अनेकदा प्रवाशांना एसटी संबंधित विविध समस्यांचा सामना करावा लागतो. अस्वच्छ स्थानक, गलिच्छ प्रसाधनगृहे, वाहकांची अरेरावी, बंद पडणाऱ्या गाड्या, थांब्यावरील हॉटेलमध्ये महागडी सेवा या सार्वत्रिक तक्रारी आहेत. गाडी वेळेत न सुटणे किंवा ऐनवेळी रद्द होणे, गळक्या किंवा नादुरुस्त बसेस लावणे, हा अनुभवही वारंवार येतो. विशेषत: स्कुलबसेस व शिवशाहीबद्दल तक्रारी सर्वाधिक आहेत. या सर्व तक्रारी आता थेट विभाग नियंत्रकांसमोर मांडता येतील आणि सुखद, समाधानी सेवा निश्चितच मिळेल, अशी अपेक्षा करुया!

!! एसटी प्रवासी राजा दिन मोहिमेच्या सर्व प्रवासी बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमधून मिळणार मनुष्यबळ;शैक्षणिक पात्रतेनुसार ६ हजार, ८ हजार आणि १० हजार प्रतिमाह विद्यावेतन

**चंद्रपूर**-राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन नोकरी मिळण्याची त्यांची क्षमता वाढविण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून उद्योजक, खासगी क्षेत्रातील आस्थापना, सेवा क्षेत्र, केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय/निमशासकीय आस्थापनांना मनुष्यबळ मिळणार आहे. यासाठी १२ वी पास प्रशिक्षणार्थींना ६ हजार, आयटीआय/पदविका ८ हजार आणि पदवीधर/पदव्युत्तर प्रशिक्षणार्थ्यांना १० हजार प्रतिमाह विद्यावेतन मिळणार आहे.शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे ही योजना राबविण्यात येणार आहे.उमेदवारांची पात्रता : किमान वय १८ व कमाल ३५ वर्षे असावे. किमान शैक्षणिक पात्रता १२ वी पास/आयटीआय/पदवीका/पदवी/पदव्युत्तर असावी. मात्र शिक्षण चालू असलेले उमेदवार या योजनेस सहभागास पात्र असणार नाहीत. उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा. त्याचे आधार नोंदणी असावे. बँक खाते आधार संलग्न असावे. कौशल्य, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करून रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा.आस्थापना/उद्योगासाठीची पात्रता : आस्थापना/उद्योग महाराष्ट्रात कार्यरत असावा. आस्थापना/उद्योगाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी. आस्थापना/उद्योगाची स्थापना किमान ३ वर्षापूर्वीची असावी. आस्थापना/उद्योगानी ईपीएफ, ईएसआयसी, जीएसटी, सर्टीफिकेट ऑफ इन कॉर्पोरेशन, डीपीआयटी व उद्योग आधारची नोंदणी केलेली असावी.प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने असेल. या कालावधीसाठी उमेदवारांना शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येईल. या योजनेंतर्गत खासगी क्षेत्रातील आस्थापना/उद्योजकांकडे एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या १० टक्के व सेवा क्षेत्रासाठी २० टक्के उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतात. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय/निमशासकीय आस्थापना/उद्योग/महामंडळ यामध्ये मंजूर पदांच्या ५ टक्के उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील.योजनादूत : शासनाच्या विविध योजनांची प्रचार प्रसिध्दी करणे व जास्तीत जास्त नागरिकांना योजनेचा लाभ पोहोचविण्यासाठी योजनादूत नेमण्याची योजना सन २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय अधिवेशनात करण्यात आली आहे. त्यानुसार ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतसाठी १ व शहरी भागात ५ हजार लोकसंख्येसाठी १ याप्रमाणे एकूण ५० हजार 'योजनादूत' नेमण्यास मान्यता देण्यात आली आहे. योजनादूतांचे विद्यावेतनही या योजनेमधून अदा करण्यात येईल. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# आदित्य कांबळे यांना द युवा ग्रामीण पत्रकार संघाचा राज्यस्तरीय उत्कृष्ट युवा उद्योजक पुरस्कार प्रदान

**हवेली । प्रतिनिधी**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी द युवा ग्रामीण पत्रकार संघातर्फे विवीध क्षेत्रांतील मान्यवरांचा उत्कृष्ट कामगिरी बद्दल राज्यस्तरीय पुरस्कार सन्मान सोहळा शिरूर नगर परिषद येथील संस्कृतिक हॉल मध्ये मोठ्या थाटामाटात पार पडला.
यावर्षीच्या उत्कृष्ट युवा उद्योजक पुरस्कारांसाठी एका होतकरू, मेहनती अन् जिद्दी समाधान हॉटेल चे मालक आदित्य कांबळे यांना उत्कृष्ट युवा उद्योजक पुरस्काराने गौरविण्यात आले.गावात एक आदर्श घालून दिला आहे व सर्वच स्तरातून त्यांचें कौतुक केले जातं आहे.अतीशय खडतर प्रवासातून मोठ्या संघर्षाने हॉटेल समाधान नावाचा ब्रँड विकसित केला. खवय्यांसाठी गुणवत्तापुर्ण पोहे, शिरा, उपमा, मिसळ, वडा पाव इत्यादि पदार्थ चवीची गुणवत्ता कायम ठेऊन सामाजिक बांधीलकी जपली आहे.



मा. रंगनाथ नाईकडे ( खत्रड मुख्य वन संरक्षक प्रादेशिक नागपूर से. नि,संचालक भारतीय सेवा पूर्व प्रशिक्षक पुणे) , मा.तृप्ती ताई देसाई ( सामाजिक कार्यकर्त्या, भूमाता ब्रिगेड संस्थापक अध्यक्षा) ,श्री. सागर शिंदे ( संपादक दैनिक सार्वभौम ) बाबसाहेब काळे ( संचालक खरेदी- विक्री संघ नगर तालुका) श्री . अन्सार शेख (द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष) श्री. विवेकानंद फंड ( द युवा ग्रामीण पत्रकार संघ सहसचिव महाराष्ट्र राज्य) श्री. हेमंत साठे ( राज्य उपाध्यक्ष),इत्यादी मान्यवरांच्या हस्ते हा उत्कृष्ट युवा उद्योजक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र , शाल श्रीफळ देऊन आदित्य ने केलेल्या कार्याबद्दल कौतुक करण्यात आले व पुढील काळात असेच सत्कार्य घडण्यास शुभेच्छा देण्यात आल्या. सदरील सन्मान सोहळ्यास विवीध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते व त्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला.

# एसटी आणि कारची समोरासमोर धडक : २ जण ठार,१५ जण जखमी

**ओतूर । प्रतिनिधी**

एसटी आणि ब्रिझा कारची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात दोन जण जागीच मृत्यूमुखी तर १५जण जखमी झाल्याची घटना रविवारी सकाळी कल्याण- अहमदनगर महामार्गावर वाघिरे महाविद्यालय ओतूर जवळ घडली.
या भीषण अपघातात मृत झालेल्या तरुणांची महेश तानाजी गायकवाड(वय २३ वर्ष,रा.मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर), प्रतीक अशोक शिर्के(वय २२ वर्ष,रा.नारळा, ता.पैठण, जि. संभाजीनगर)आशी नावे आहेत. अपघातातील १५ जखमींना आळेफाटा, नारायणगाव येथे उपचार करून घरी पाठवण्यात आल्याने त्यांची नावे समजू शकली नाहीत. पारनेर एसटी आगराची



पारनेर-मुंबई ही एसटी(क्र.एम. एच.१४,बी.टी.४२८०) नगर-कल्याण महामार्गा वरून मुबंईला जात असताना,ओतुरकडून आळेफाट्याच्या दिशेने जाणारी ब्रीझा कार (क्र.एम.एच.४६, सी.एम.२१५५) ची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात ब्रिझा कार चालकासह एकजण जागीच ठार झाले तर पारनेर मुबंई एसटीमधील पंधरा प्रवासी जखमी झाले.परिसरातील नागरिकांनी अपघातातील जखमींना उपचारासाठी हलविले.ब्रिझाकार आणि एसटी अपघाताची तीव्रता इतकी मोठी होती की ब्रिझाकार जाग्यावरच चक्काचूर झाली तर एसटी रस्त्या सोडून खाली खड्ड्यातील झाडावर जाऊन आदळी.अपघाताची माहिती मिळताच ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे,पोलीस उपनिरीक्षक अजित पाटील,पोलीस हवलदार शामसुंदर जायभाय,मनोज कोकणी,विलास कोंधवळे हे पोलिस पथकासह घटनास्थळी धाव घेऊन मदत कार्य केले.

# राष्ट्रीय विश्वगामी समाजकार्य संघाच्या संपर्क प्रमुख पदी कल्याण वाल्हेकर सर यांची निवड

## कल्याण वाल्हेकर सर यांचा सत्कार करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव

**आष्टी । प्रतिनिधी**

समाजातील प्रत्येक घटकांच्या न्याय हक्कासाठी नेहमी तत्पर राहून लढणाऱ्या भारतीय सरकार मान्यता प्राप्त राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघ संचलित राष्ट्रीय विश्वगामी समाजकार्य संघाच्या आष्टी तालुका संपर्क प्रमुख पदी राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संतोष निकम,राष्ट्रीय प्रदेशाध्यक्ष वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रामध्ये अनेक वर्षांपासून कार्यरत असलेले शिक्षक कल्याण वाल्हेकर सर यांची आष्टी तालुका संपर्कप्रमुख पदी निवड करण्यात आलीट आहे. त्यांचे निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.
आष्टी तालुक्यातील हाजीपूर येथील कल्याण वाल्हेकर सर हे अनेक वर्षापासून विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्रात प्रवाहात आणतात अनेक विद्यार्थी घडवले त्यांचे सर्व विद्यार्थी उच्च पदावर आहेत.पंडित महाविद्यालय आष्टी येथे ते विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाचे कार्य करतात याबरोबरच प्रवचानाच्या माध्यमातून देखील जनजागृती करत आहेत.धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असतात त्यांच्या या कार्याची दखल घेत नुकतेच त्यांना राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघ संचलित राष्ट्रीय विश्वगामी समाजकार्य संघाच्या आष्टी तालुका संपर्क प्रमुख पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.त्यांच्या निवडीबद्दल पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाच्या वतीने सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी विद्यालयाचे प्राचार्य सुरेशजी बोडखे सर,मा.सरपंच विठल राख, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम,पत्रकार संतोष नागरगोजे,अक्षय विधाते व सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सह विविध क्षेत्रातील नागरीकांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या



# बापूराव देशमुख अभियांत्रिकीच्या ५ विद्यार्थ्यांची कोल्ब्रो ग्रूप मध्ये निवड

**वर्धा । प्रतिनिधी**

बापूराव देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्थापत्य इंजिनिअरींग विभागातील ०५ विद्यार्थ्यांची बांधकाम क्षेत्रातील अतिशय नामांकित असलेल्या कोल्ब्रो ग्रुप, नागपूर कंपनीत निवड झाली असून ते कंपनीच्या मुंबई स्थित शाखेत रुजू होणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय मकरंदे यांनी दिली. कोल्ब्रो ग्रुप, नागपूर या स्थापत्य क्षेत्रातील नामांकित कंपनीने महाविद्यालयातील शेख अरबाझ, ऋषिकेश केल्वाडकर, विनय गुजर, प्रज्वल वाटकर, चैतन्य भाबरे या स्थापत्य विभागातील ०५ विद्यार्थ्यांची सर्व्हेअर इंजिनीअर या पदासाठी निवड केली असून वार्षिक ३.०० लाख इतके वेतन कंपनी तर्फे देण्यात येणार असून यासोबतच त्यांच्या निवासाची, जेवणाची सर्व व्यवस्था कंपनीतर्फे करण्यात येणार असल्याचे प्राचार्य डॉ. संजय मकरंदे यांनी यावेळी बोलतांना सांगितले.

ही कंपनी स्थापत्य क्षेत्रात अग्रेसर असून संपूर्ण भारतात कंपनी तर्फे मुंबई, गोवा, नागपूर इत्यादी ठिकाणी अनेक प्रकल्प राबविले जात आहेत. मालमत्ता कर मूल्यांकन सर्वेक्षण, मालमत्ता सर्वेक्षण, ऋख्खड मॅपिंग, रेकॉर्डचे संगणकीकरण, डेटाबेस देखभाल आणि औद्योगिक विकास या सारखे अनेक प्रकल्प राबविण्यात असल्याने बांधकाम क्षेत्रातील नामांकित कंपनी म्हणून नावलौकिकास आली आहे.

बा. दे. अभियांत्रिकीचे विद्यार्थी आज विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यात आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. मागील ५ वर्षात बा. दे. अभियांत्रिकी मधून




१५६१ विद्यार्थ्यांची निवड झाली असून यावरून विविध कंपन्यात प्लेस होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे सध्याच्या आकडेवारीवरून दिसून येते. विद्यार्थ्यांना ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागामार्फत स्वतंत्रपणे कुशल प्रशिक्षकांद्वारे एप्टीट्युड, कम्युनिकेशन स्कील, टेक्निकल स्कील, मॉक इंटरव्युव्ह इत्यादी प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी विविध तज्ज्ञ महाविद्यालयात बोलाविले जात असून जगभरातील अ नेक नामांकित कंपन्या महाविद्यालयात कॅम्पससाठी येण्यासाठी उत्सुक असल्याची माहितीट्रेनिंग अॅड प्लेसमेंट अधिकारी डॉ. भूषण लांडे यांनी यावेळी बोलतांना दिली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समिर देशमुख, प्राचार्य डॉ. संजय मकरंदे, स्थापत्य विभाग प्रमुख प्रा. अमर डेहने, ट्रेनिंग अॅड प्लेसमेंट अधिकारी डॉ. भूषण लांडे, प्रा. वैभव काळमेघ तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांनी अभिनंदन करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# दीक्षाभूमी येथे झालेल्या आंदोलना मधील गुन्हे सरकारने मागे घ्यावेत

## माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**मुंबई । प्रवीण बागड़े**

पवित्र दीक्षाभूमी येथील भूमिगत पार्किंगच्या मुद्द्याला घेऊन १जुलै ला उसळलेल्या गर्दीनंतर नागपूर पोलिसांनी आंदोलकांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. दीक्षाभूमीवर झालेल्या आंदोलनानंतर बांधकाम साहित्याची तोडफोड आणि साहित्य जाळपोळ केल्याप्रकरणी नागपूरच्या बजाज नगर पोलिसांनी आंदोलकांवर गुन्हे दाखल केले आहे. आंदोलक गुन्हेगार नाहीत त्यामुळे आंदोलकांवरील गुन्हे सरकारने मागे घ्यावेत, अशी मागणी आज सभागृहात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेना राज्याचे माजी मंत्री आणि नागपूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केली.

१जुलै ला दीक्षाभूमी परिसरात झालेल्या घटनेतनंतर बजाजनगर पोलिस ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल केले आहेत. यात भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम १२५, १३२, १८९(२), १८९(५),१९०, १९१ (२), २९६, ३२६ (एफ), ३२६(जी) अंतर्गत गुन्हा पोलिसांनी दाखल केले आहे. यावेळी विद्यार्थ्यांवर गुन्हा दखल करण्यात आले होते. हे विद्यार्थी शाळा आणि कॉलेज मध्ये शिकणारे विद्यार्थी असल्याने त्यांचा वरील गुन्हे मागे घेण्यात यावे अशी मागणी यावेळी डॉ. राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना केली.दीक्षाभूमी येथे पार्किंगसाठी



खोदलेल्या खड्ड्यामुळे स्तूपाला धोका होईल, बोधिवृक्ष अडचणीत येईल त्यामुळे दीक्षाभूमी येथे भीमसैनिकांनी स्वयंस्फूर्तीने आंदोलन केले होते. आंदोलन करणाऱ्या शेकडो ज्ञात-अज्ञात आंदोलकांवर पोलिसांनी गंभीर प्रकाराचे गुन्हे दाखल केले आहे. प्रकरणी आम्ही आंदोलन करणारे आहोत गुन्हेगार नाहीत. आंदोलकांवरील गुन्हे सरकारने मागे घ्यावेत, अशी मागणी याअगोदर ही डॉ. राऊत यांनी सभागृहात लावून धरली होती.

### नागपूर पोलीस आयुक्तांना मुख्यमंत्र्यांच्या सूचना

**आमदार डॉ. नितीन राऊत यांनी आज पुन्हा एकदा भूमिगत पार्किंग विरोधात दीक्षाभूमी येथे घडलेल्या घटनेत दाखल केलेले गुन्हे वापस घेण्याची मागणी केली असता यावर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दखल घेत नागपूर पोलीस आयुक्तांना सूचना केले असल्याचे उत्तर दिले. ज्यामुळे आता गुन्हे दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.**

# मूल पोलिसांची अवैध दारू विक्रेत्यावर धाड



**मूल । प्रतिनिधी**

मूल शहरातील सोमनाथ रोडवर असलेल्या पानठेल्यावर अवैध दारू विकल्या जात होती. मुल पोलिसांनी धाड टाकून कारवाई केली आहे. त्यामुळे मूल शहरात अवैध दारू विक्री करीत असलेल्या सर्व अवैध दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहे.

पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन चंद्रपुर, उप विभागीय पोलीस अधिकारी एस. एस. भगत. यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुमित परतेकी पोस्टॉफ सफौ उत्तम कुमरे पोहवा भोजराज मुडरे, सचिन सायंकार, नापोअं चिमाजी देवकते चालक स्वप्नील खोब्रागडे सह मुल टाउन परिसरात पायदळ पेट्रोलिंग करीत असता गुप्त माहीती व्दारे माहीती मिळाली कि सोमनाथ रोड मुल येथील पानठेला चालक नामे मंगेश सुधाकर मडावी वय २६ वर्ष, रा. मुल वार्ड क. १ हा आपले पानठेल्यात अवैदयरित्या दारूची विक्री करीत आहे अश्या माहिती वरून त्याचे पानठेल्याची झडती घेतली असता त्याचे पानठेल्यामध्ये एका प्लॉस्टीक थैलीत ७४ नग रॉकेट संत्र कंपनिच्या प्रत्येकी ९० एम एल नी भरलेल्या किमत २,५९० रुपये चा मुददेमाल मिळुन आला. तसेच त्याचे बाजुला असलेला पानठेला चालक नामे प्रदिप लिलाधर शेडे वय ३८ वर्ष रा. वार्ड क्र.२ मुल याचे पानठेल्याची झडती घेतली असता त्याचे पानठेल्यामध्ये असलेल्या फिज मध्ये एका प्लॉस्टीक थैलीत देशी व विदेशी दारूच्या शिश्या मिळुन आल्या. त्यात ६ नग रॉयल स्टॅग कंपनिची विदेशी दारू प्रत्येकी १८० एम.एल नि भरलेल्या किमंत १०८० रुपये ,११ नग रॉकेट देशी दारू संत्र कपनिच्या प्रत्येकी ९० एम.एल.च्या किमत ३८५ रुपयाचा व दारू ठेवण्याकरीता वापरलेली फ्रीज किमत अंदाजे १०,००० हजाराचा मुददेमाल मिळुन आला असा एकुण दोन्ही गुन्हयाचा मुद्देमाल किमत १४,०५५ रुपयाचा मुददेमाल मिळुन आल्याने नमुद दोन्ही आरोपींवर गुन्हा नोद करण्यात आला असुन पुढील तपास सुरु आहे.

## शहरात महामार्गावर अपघातांचे ब्लॅक स्पॉट

# गतिरोधक लावण्याची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा मुल यांची मागणी

**मूल । प्रतिनिधी**

मूल शहरातून जाणाऱ्या महामार्गावर असलेल्या पोच मार्गालगत अनेक ठिकाणी अपघातांचे ब्लॅक स्पॉट तयार झाले असून भविष्यात अपघाताच्या घटना टाळण्याकरीता या धोक्याचे ठिकाणी त्वरीत गतीरोधक लावण्याची मागणी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ तालुका शाखा मूल तर्फे निवेदनाद्वारे करण्यात आली.नुकतेच संघाद्वारे सा.बा.उपविभाग मूल येथे अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. शहरातून जाणाऱ्या महामार्गावर दुर्गा माता मंदिरालगत असलेल्या चौकात व उप जिल्हा रूग्णालय कडे जाणाऱ्या पोच मार्गावरील चौकात मोठे



अपघात स्थळ तयार झाले असून अपघाताच्या घटना इथे घडत असतात.याच ठिकाणातून कर्मवीर महाविद्यालयाची, शासकीय रूगणालयात सतत वर्दळ सुरू असते. या दोन्ही ठिकाणी दोन्ही बाजूला मजबूत गतीरोधक बसविण्याची मागणी राज्य पत्रकार संघातर्फे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदन देताना तालुका शाखा अध्यक्ष सतिष राजूरवार, उपाध्यक्ष धर्मेंद्र सूत्रपवार, सचिव राजेंद्र वाढई , संघटक मंगेश नागोशे , राजेंद्र सुत्रपवार,आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# मनरेगाची कामे पूर्ण करण्या साठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्याला यश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महात्मा गांधी राष्ट्रीय व ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) अकुशल घटकांतर्गत झालेल्या कामांच्या अनुषंगाने उपलब्ध होऊ शकणा-या अतिरिक्त अनुज्ञेयातून कुशल घटकांतर्गत कामे करण्यासाठी शासनस्तरावरून जिल्हानिहाय कामे सुचविण्यात आली आहे. त्यामुळे सर्व वैधानिक व प्रशासकीय बाबींची पुर्तता करून ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत मनरेगाची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून मनरेगाची कामे पूर्ण करण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ मिळाली आहे.

मनरेगा संबंधित आर्थिक वर्षात जिल्हास्तरावर कुशल घटकांवरील खर्चाचे प्रमाण एकूण खर्चाच्या ४० टक्क्यांपर्यंत विहीत करण्यात आले आहे. तसेच मनरेगा अंतर्गत स्थायी, उत्पादक आणि पायाभूत स्वरुपाच्या मत्तेची ग्रामपंचायतींची मागणीसुध्दा आहे. मात्र कुशलप्रधान कामे पुरेशा प्रमाणात हाती न घेतल्यामुळे अकुशल खर्चाच्या दोन तृतीयांश प्रमाणात केंद्र शासनाकडून उपलब्ध होऊ शकणारा कुशल स्वरुपाचा खर्च होऊ शकला नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन कुशल घटकाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षापासून शासन स्तरावर जिल्हानिहाय नियोजन करण्यात येत आहे. त्यानुसार सन २०२१-२२, सन २०२२-२३ आणि सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये शासनस्तरावरून सुचविण्यात आलेली कुशलखर्च प्रधान कामे सर्व वैधानिक बाबींची पूर्तता करून ३१ डिसेंबर २०२४ पूर्वी पूर्ण करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय व ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) साहित्य या घटकावरील जिल्हानिहाय खर्चाचे प्रमाण चालू आर्थिक वर्षात (२०२४-२५) जास्तीत जास्त ४० टक्क्यांपर्यंत राखले जाईल, या समन्वयाने कामे पूर्ण करावी. मिशन वॉटर कन्झर्व्हेशन या अभियानांतर्गत समावेश असणा-या तालुक्यांमध्ये विहीत केल्याप्रमाणे (कमीतकमी ६५ टक्के खर्च) नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन या स्वरुपाची कामे घ्यावीत तसेच मनरेगा अधिनियम २००५ नुसार योजनेंतर्गत कृषी व संलग्नील कामे घेण्यात येऊन चालू आर्थिक वर्षाअखेरपर्यंत सदर कामांचे व त्यावरील खर्चाचे विहीत प्रमाण राखले जाईल, याची दक्षता घ्यावी, असे शासनाच्या आदेशात म्हटले आहे.

# लालपरीचे बाबराळ्यात पहिल्यांदाच आगमन ;ग्रामस्थांनी केले जंगी स्वागत

**मूल । प्रतिनिधी**

मुल तालुक्यातील जवळपास १७ किलोमीटरवर असलेल्या बाबराळा येथे बस सेवा पहिल्यांदाच पोहोचली असल्याने ग्रामस्थांनी बस चे जंगी स्वागत केले आहे.या गावात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवामध्ये ही बस सेवा पोहोचलीच नसल्याने नागरिक त्रस्त होते. गाव तेथे बस ही शासनाची योजना असली तरी बाबराळा सारखी कित्येक गावे आजही बस सेवेपासून वंचित आहेत. मंगळवार (दि ९) ला सकाळी आठ वाजताच्या दरम्यान पहिल्यांदाच लालपरी बाबराळा येथे पोहोचल्याने गावकऱ्यांच्या आनंदाला पारावर उरला नाही. ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांनी यावेळी चालक व वाहक यांना शाल, श्रीफळ देत सत्कार केला.बाबराळा येथे बस सेवा सुरू व्हावी म्हणून ग्रामपंचायतीच्या वतीने प्रशासनाला अनेकदा निवेदन दिली. व सातत्याने



पाठपुरावा केल्याने प्रशासनाने दखल घेत बस सेवा सुरू केली आहे. बाबराळा येथे फक्त ४ थि पर्यंत चे शिक्षण आहे. पुढील शिक्षणाकरिता विध्यार्थ्यांना बाहेर गावी किंवा तालुक्याच्या ठिकाणी शिक्षणासाठी जावे लागते. बाबराळा गावा पासुन तालुक्याचे ठिकाण १६ ते १७ किमि. अंतरावर असुन विध्यार्थ्यांना जाण्या येण्यासाठी कोणतेही वाहतुकिचे साधन नाही. मुल भेजगाव बेंबाळ मार्गावर असलेला बाबराळा बसस्थानक गावापासुन २ कि.मी. अंतरावर असल्यामुळे विध्यार्थ्यांना बसस्थानकावर वेळेवर पोहोचने शक्य होत नाही. करीता फिस्कुटी मार्गे गडिसुर्ला वरुन बाबराळा गावापर्यंत सकाळी ७.०० वाजता आणी सांयकाळी ५.०० वाजता बस सेवा उपलब्ध करून देण्याची मागणी ग्रामपंचायत सरपंच धिरज गोहणे यांनी केली होती. बाबराळा गावात प्रथमच बस सेवा सुरू झाल्याने गावचे सरपंच धिरज गोहणे उपसरपंच अनिता शरद नाहगमकर,ग्रामपंचायत सदस्य आणि समस्त बाबराळा वासीय ग्रामस्थ यांच्या हस्ते महामंडळाचे कर्मचारी यांचे सत्कार करण्यात आला. बाबराळा येथे बस सेवा सुरू झाली असल्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्ट्या ही बस फायदेशीर ठरणार आहे.

**बाबराळा येथे बस सेवा सुरू व्हावी म्हणून अनेक वर्षांपासून निवेदन देत मागणी केली होती. मात्र आज प्रत्यक्षात गावात बस आल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.बस मुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक फायदा होणार आहे.**

**धिरज गोहणे,**
**सरपंच बाबराळा**

# उद्योगांना चालना देण्यासाठी १५ जुलै रोजी ‘इग्नाईट महाराष्ट्र’ कार्यक्रम

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्यात उद्योग व उद्यमशीलता विकासासाठी राज्य शासनाच्या उद्योग संचालनालय, मुंबई च्या वतीने अनेक योजना राबविण्यात येत आहेत. सदर योजनांचा लाभ अधिकाधिक उद्योजकांना मिळणे तसेच उद्योगांमध्ये गुंतवणूक, वृध्दी, निर्यात व ‘एक जिल्हा एक उत्पादन’ यावर (जऊजझ) सुक्ष्म, लघु, मध्यम उपक्रमावर आधारित १५ जुलै रोजी ‘इग्नाईट महाराष्ट्र’ यावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या प्रमुख उपस्थितीत १५ जुलै रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २.३० पर्यंत नियोजन भवन, चंद्रपूर येथे सदर कार्यक्रम होणार आहे. उद्योग विभागतर्फे एम.एस.एम.ई क्षेत्रावर भर देवून त्यांची कार्यक्षमता वाढविणे, राज्यात उद्योजकीय वातावरण अधिक व्यापक करून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात निमार्ण करणे, तसेच एक जिल्हा एक उत्पादन (जऊजझ)उपक्रम व निर्यात वृध्दीस चालना देण्यासाठी तसेच उद्योग विकासाठी राज्य व केंद्र शासनाचे विविध विभाग, त्यांचे उपक्रम व योजना राबवित आहेत. त्यादृष्टीने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यशाळेस सुक्ष्म, लघु, मध्यम घटक, निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नवउद्योजक, औद्योगिक समूह, औद्योगीक संस्था व संघटना,औद्योगिक वसाहती, शेतकरी सहकारी संस्था व उत्पादक, प्रक्रिया उत्पादकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग विभागाने केले आहे.

# लंडनवरून येणारी वाघनखे छत्रपती शिवाजी महाराजांचीच

# शंका उपस्थित करणाऱ्यांना सुधीर मुनगंटीवार यांचे सडेतोड उत्तर

## १९ जुलै रोजी साताऱ्यात जल्लोषात होणार स्वागत

**मुंबई । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज हा आमच्या आस्थेचा, स्वाभिमानाचा आणि जिव्हाळ्याचा विषय असून, हे सरकार छत्रपती शिवरायांबाबत अतिशय गंभीर आहे. लंडनहून येणाऱ्या वाघनखांसंदर्भात राज्यातील जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा प्रकार अत्यंत दुर्दैवी असून ही वाघनखे महाराजांचीच असल्याचा पुरुच्चार करीत याविषयी शंका उपस्थिती करणाऱ्यांचा राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी आज विधानसभेत चांगलाच समाचार घेतला.

विधानसभेत गुरुवारी अकोला पूर्व चे आमदार रणधीर सावरकर लंडनवरून आणण्यात येणारी वाघनखे ही छत्रपती शिवाजी महाराजांची असण्याबाबत बाहेर जी सभ्रम पसरविणारी चर्चा सुरु आहे यावर सांस्कृतिक मंत्र्यांनी निवेदन करण्याची मागणी केली. यावर सविस्तर बोलताना ना. सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांच्या खास शैलीत टीकाकारांना धारेवर धरले. ना. मुनगंटीवार म्हणाले की, लंडन येथील व्हिक्टोरिया अँड अलबर्ट संग्रहालयात असलेल्या वाघ नखाबाबत विविध पुरावे उपलब्ध आहेत. ते म्हणाले, लंडनवरून आणण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या वाघनखांचे प्रदर्शन येत्या १९ जुलै रोजी साताऱ्यातील छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयात करण्यात येत असून, तेथे जोरदार स्वागत होणार असून कार्यक्रमाचे जाहिर निमंत्रणदेखील त्यांनी आमदारांना दिले.

ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेले अतिक्रमण हटवले गेल्यानंतर अनेक शिवभक्तांनी छत्रपतीं शिवाजी महाराजांची वाघनखे लंडन मध्ये असून ती भारतात आणावीत अशी मागणी केली. त्यासंदर्भातील काही कागदपत्रे अनेक शिवभक्तांनी आमच्याकडे आणून दिली, पाठवली. व्हिकटोरीया अँड अल्बर्ट संग्रहालयाकडे सदर वाघनखे दिली जाण्या पूर्वी लंडनमध्ये १८७५ व १८९६ या वर्षी झालेल्या एका प्रदर्शनात ही वाघनखे प्रदर्शित झाली होती. त्या प्रदर्शनाच्या बातम्यांची कात्रणेही काही शिवभक्तांनी पाठवली, ज्यात ती वाघनखे छत्रपती शिवाजी महाराजांनी वापरलेली असल्याचा उल्लेख त्या प्रदर्शनात केला असल्याचे त्या बातम्यात म्हटले होते. लंडनमधील संबंधित संग्रहालयात अनेक वाघनखे आहेत हे खरे असले तरी केवळ या विशिष्ट वाघनखांनाच १८२५ मध्ये विशेष पेटीचे आवरण बनविण्यात आले आहे आणि त्यावर ही वाघनखे छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखान वधासाठी वापरल्याचा स्पष्ट उल्लेख आहे अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

यासंदर्भात अनेक शिवभक्तांनी लंडनमधील संग्रहालय तसेच ब्रिटिश सरकारच्या संबंधित खात्यांशी पूर्वीपासून केलेला पत्रव्यवहार उपलब्ध असून त्याच आधारावर आम्ही पुन्हा लंडनमधील संबंधित संग्रहालय आणि ब्रिटिश पंतप्रधान यांच्याशी पत्रव्यवहार केला. त्याचे उत्तर देताना संबंधित संग्रहालयाने हे मान्य केले की ही वाघनखे छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखान वधासाठी वापरलेली आहेत, असे सांगून ना. सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले की, तरीही आम्ही अनेक इतिहास संशोधकांकडून महिती घेतली की जगात कुठे इतरत्र अशी वाघनखे आहेत का? व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट संग्रहालयासोबत आपण केलेल्या पत्रव्यवहारात किंवा बोलणी केली तेव्हाही या संग्रहालयाने कधीही ही



वाघनखे छत्रपती शिवाजी महाराजांची असल्याचे नाकारले नाही, अशी माहिती ना. सुधीर मुनगंटीवार यांनी सभागृहाला दिली. त्यानंतर सदर संग्रहालयाने ही वाघनखे आधी एक वर्षाकरता देण्याचा प्रस्ताव दिला, आणि पुन्हा बोलणी केल्यानंतर ही वाघनखे तीन वर्षांकरता देण्याचे त्यांनी मान्य केले, असे ना.सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

### दि. १९ जुलै पासून साताऱ्यात वाघनखांचे प्रदर्शन

लंडनवरून येणारी छत्रपती शिवाजी महाराजांची ही पवित्र वाघनखे येत्या दि. १९ जुलै पासून साताऱ्यातील छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयात प्रदर्शित केली जाणार असून जनतेला त्याचे दर्शन घेता येईल. या सोबतच या संग्रहालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या शस्त्रे प्रदर्शित करणाऱ्या एका शस्त्र दालनाचेही उद्घाटन करण्यात येणार आहे, असेही ना. सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले. या कार्यक्रमांसाठी सर्व विधिमंडळ सदस्य आणि सर्व शिवप्रेमी सादर निमंत्रित आहेत, असेही ते म्हणाले.

### वाघनखे आणण्याकरता केलेला खर्च नगण्य, चुकीच्या माहितीवर जनतेने विश्वास ठेवू नये

वाघनखे आणण्याकरता एक नवीन पैशाचेही भाडे दिले जाणार नाही असे ना. सुधीर मुनगंटीवार म्हणले. यासंदर्भातील अफवांवर जनतेने विश्वास ठेवू नये असे आवाहन त्यांनी केले. ही वाघनखे आणण्याकरता विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या एका दिवसाच्या खर्चापेक्षाही कमी म्हणजे केवळ १४ लक्ष आठ हजार रुपयांचा खर्च करार करण्याकरता जाण्यायेण्याचा झाला आहे, अशी माहितीही ना.सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. त्याचबरोबर हा वाघनखे ठेवण्याकरता खर्च केला जात नसून छत्रपती शिवाजी महाराजांच्या सर्व शस्त्रांचे जे प्रदर्शन आपण चार ठिकाणी उभे करीत आहोत, त्या त्या संग्रहालयांचे नूतनीकरण आणि डागडुजी याकरता ७ कोटी (अक्षरी सात कोटी) इतकाच खर्च झालेला आहे, असेही ना.सुधीर मुनगंटीवार यावेळी म्हणाले.हे शिवराज्याभिषेकाचे ३५० वे वर्षच नव्हते अशी शंका काहींनी उपस्थित करणे हे ही दुर्दैवी आहे असे ते म्हणाले. शिवराज्याभिषेकाच्या संदर्भातील एक पुस्तिका लवकरच तयार करण्यात येईल, ज्यातून सर्वच शंकांचे निरसन होईल असेही ना. सुधीर मुनगंटीवार यावेळी म्हणाले.

# गडचिरोलीतील आदिवासी लेकरांच्या पंखांना मिळाले सूरजागड लोहप्रकल्पाचे बळ

## स्वप्न साकारण्यासाठी लॉयड मेटल कंपनीच्या मदतीने घेतली ऑस्ट्रेलियात भरारी

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

राज्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या नक्षलग्रस्त, आतिदुर्गम गडचिरोली जिल्ह्याच्या एटापल्ली तालुक्यातील कुद्री गावातील सुप्रिया शंभरकर तर पेठा गावचा अजित कोरामी आणि अन्य चार असे एकूण सहा बारावी उत्तीर्ण विद्यार्थी लॉयड मेटल्सच्या पुढाकारातून उच्च शिक्षणासाठी ऑस्ट्रेलिया गाठले आहेत. होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते त्यांना हवाई सफारीचे तिकीट देण्यात आले.



लॉयड मेटल्स कंपनी एटापल्ली तालुक्यातील सुरजागड येथे लोह उत्खनन करीत असून या कंपनीचा चामोर्शी तालुक्यातील कोनसरी येथे स्टिल निर्मिती प्रकल्पही आकाराला येत आहे. सुमारे ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक असलेल्या या कंपनीचे व्यवस्थाकीय संचलक गी. प्रभाकरण यांनी लॉयड इन्फिनिट फाऊंडेशनच्या माध्यमातून एटापल्ली तालुक्यातील होतकरून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी विदेशात पाठविण्याचा निर्णय घेतला. यामध्ये ३८ विद्यार्थ्यांची चाचणी घेण्यात आली. त्यातून बुद्धिमत्ता, शैक्षणिक कामगिरी, इंग्रजी ज्ञान, शिकण्याची उत्सुकता आणि परदेशी वातावरणाशी जूळवून घेण्याची क्षमतेचे काटेकारपणे मूल्यांकन करण्यात आले. यात पात्र ठरेलेल्या सहा विद्यार्थ्यांची परदेश शिक्षणासाठी निवड करण्यात आली. त्यांना इंग्रजी विषयाचे विशेष प्रशिक्षण दिले. शिक्षणासाठी सुमारे एक कोटी ५१ लाख ५ हजार ४९२ रुपयांची शिष्यवृत्ती मंजूर झाली. ऑस्ट्रेलियातील कर्टिन विद्यापीठ या नामांकित संस्थेत हे सर्वजण उच्चशिक्षण घेणार आहेत.

### या विद्यार्थ्यांचा समावेश

सुप्रिया शंभरकर ही बॅचलर ऑफ मायनिंग इंजिनिअरिंगच्या चार ते पाच वर्षाच्या पदवीच शिक्षण घेणार आहे. तर शिल्प महा रा. मंगनेर ही बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशनची पदवी घेणार आहे. पेठा गावचा अजित कोरामी व शुभम गोटा हे दोघे बॅचलर ऑफ सायन्स (हेल्थ सायन्स) ही पदवी संपादन करणार आहेत. झारेवाडाचा राहूल नरोटी हा बॅचलर ऑफ कॉमर्सचे शिक्षण घेईल तर इझासिय बडा रा. बंडे हा मास्टर ऑफ इनोव्हेंशन अँड एंअ्रेप्टरशिपच्या पदवीच शिक्षण घेणार आहे.

# कॅन्सर रुग्णास डॉ.सतिश वारजुकर कडून आर्थिक मदत



**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील मौजा. मजरा येथे कॅन्सरग्रस्त रुग्णास राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्वय चिमुर विधानसभा क्षेत्र डॉ. सतिश वारजुकर यांच्या तर्फे चिमूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. विजय गावंडे यांच्या हस्ते सदर मदत देण्यात आली.

सविस्तर वृत्त असे की,मौजा.मजरा येथील विजय मेश्राम हे भूमिहीन शेतमजूर व कुटुंब प्रमुख आहेत. मिडेल ते काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते, वारंवार तबेत खराब असल्याने ते दवाखान्यात उपचारासाठी भरती केले असता डॉक्टरांनी त्यांना कॅन्सर असल्याचे सांगितले, पुढील उपचारासाठी ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कैंसर हॉस्पिटल नागपूरला गेले असता काही महिन्यानंतर पुन्हा त्यांना कॅन्सरचा त्रास सुरु झाला. घरातील प्रमुख व्यक्तीवर अशी वेळ आल्याने कुटुंबावर आर्थिक संकटाची बाजू आली. त्यांना पुढील उपचारासाठी आर्थिक मदतीची गरज असल्याची माहिती डॉ. सतिश वारजुकर यांना दिली असता त्यांना आर्थिक मदत देण्यात आली. आर्थिक मदत देताना माजी संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती अमोद गौरकर, मनोज राने, उपस्थित होते.

# भाविकांच्या सुविधेसाठी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना

## भाविकांनी १८००-२३३-१२४० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा- अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर

**पंढरपूर । प्रतिनिधी**

आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. या यात्रेत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही यासाठी प्रशासनाने आवश्यकती तयारी केली असून, यात्रेत भाविकांच्या सोयी, सुविधा, स्वच्छता तसेच सुरक्षितेला प्राधान्य देण्यात आले आहे. यात्रा कालावधीत भाविकांच्या सुविधेसाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास कार्यरत राहणार असून, भाविकांना अडचण आल्यास १८०००-२३३-१२४० या टोल फ्री क्रमांकावर तसेच ०२१८६-२२०२४० व २९९२४३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन अपर जिल्हाधिकारी तथा इन्सिंडट कमांडर मोनिका सिंग ठाकूर यांनी केले आहे.



आषाढी वारीत येणाऱ्या भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा तात्काळ मिळाव्यात त्याचबरोबर आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतेही गैरसोय होऊ नये यासाठी पत्राशेड, ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट, विठ्ठल-रुक्मिणी मंदीर, नगरपालिका, तहसिल कार्यालय येथे आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली आहे. तसेच मुख्य आपत्कालीन मदत व प्रतिसाद केंद्र प्रांत कार्यालय पंढरपूर येथे कार्यान्वित करण्यात आले आहे.आरोग्य विभागामार्फत यासाठी पत्राशेड, ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट, विठ्ठल-रुक्मिणी मंदीर येथे प्रथमोपचार केंद्र उभारण्यात आली आहेत. तसेच या ठिकाणी मुबलक प्रमाणात औषधसाठा उपलब्ध करण्यात आला आहे. सर्व सुविधायुक्त रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आली आहे. तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून दर्शन रांग, पत्राशेड, चंद्रभागा वाळवंट, ६५ एकर व मंदीर परिसर येथे वेळोवेळी स्वच्छता करण्यात येत आहे.६५ एकर परिसरात मुबलक प्रमाणात पाणी व्यवस्था, अखंडीत व सुरक्षित विद्युत पुरवठा, अग्निशमन व्यवस्थेसह फिरते आरोग्य पथकांची नेमणूक करण्यात आली आहे.नदीपात्रात स्वच्छता व पुरेसा प्रकाश राहिल याची दक्षता घेण्यात आली आहे. डास प्रतिबंधासाठी औषधाची फवारणी, शहरात वाहतुक व्यवस्था सुरळीत रहावी, वाहतुकीस कोणतेही अडचण येवू नये यासाठी शहराबाहेर मोकळया जागेवर वाहन पार्किंग व्यवस्था करण्यात आली असल्याचे अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर यांनी सांगितले.

# व्हॉइस ऑफ मीडिया चा वतीने स्वामीनी पवार चा गौरव

## तीन मुख्याध्यापिकाकडून सन्मान चिन्ह देऊन केला गौरव

**बार्शी । प्रतिनिधी**

राज्यासह देशात नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत नावारूपास येत असलेल्या देशव्यापी व्हॉइस ऑफ मीडिया या पत्रकार संघटनेच्या बार्शी शाखेच्या वतीने पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा सन्मान करण्यात आला.शहरातील नामवंत सिल्वर जुबली शाळेमध्ये दीपाली गोरे, भारती चोपडे, पूनम वासकर, दीपाली कळसकर, तेजश्री स्वामी आदींच्या उपस्थिती मध्ये पत्रकार विक्रांत पवार यांची कन्या स्वामीनी पवार हिचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला तसेच तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा हि दिल्या.

यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत मुख्याध्यापकांचा सत्कार संपन्न

**मूल । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद चंद्रपुर अंतर्गत पंचायत समिती शिक्षण विभाग मुल तर्फे राज्यात राबवलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा तसेच सर्व व्यवस्थापनाच्या शाळा यांचा पंचायत समिती मूल च्या सभागृहात सत्कार सोहळा पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष गटविकास अधिकारी बी एच राठोड होते आणि प्रमुख पाहुणे गटशिक्षणाधिकारी वर्षां पिंपरे होत्या.



याप्रसंगी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधून प्रथम क्रमांक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा डोंगरगाव द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपरी दीक्षित आणि तृतीय क्रमांक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा बोरचांदली तसेच इतर व्यवस्थापनाच्या विभागातून प्रथम क्रमांक विश्वशांती विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालय मारोडा द्वितीय क्रमांक देवनिल विद्यालय टेकाडी आणि तृतीय क्रमांक श्रीमती इंदिरा गांधी हायस्कूल जुनासर्ला शाळेच्या मुख्याध्यापीका अनुक्रमे अल्का रेवतकर, आशा जोगी, शंकर चिचघरे, सुनील येनगंटीवार, राजेश सावरकर, बंडू रोहनकर यांचा पुष्पगुच्छ, प्रशस्तीपत्र व मोमेंटो देऊन सत्कार करण्यात आला सत्कार, कार्यक्रमाला पिपरी दीक्षित येथील सरपंच श्वेता उरकुडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी वर्षा पिंपरे यांनी केले तर आभार आनंद गोंगले यांनी मानले.क्ष

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .